IDAA आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना

International Diwali Ank Association

# विशेष आंतरराष्ट्रीय विनाशुल्क खुली मराठी दिवाळी अंक स्पर्धा २०१२

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची एक सांस्कृतिक परंपरा असून ती अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार साहित्याची निर्मिती व्हावी या उद्देशाने **जयसिंगपूर** येथील **आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना** दरवर्षी दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करते, त्यात उत्कृष्ट दिवाळी अंकांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येते. याही वर्षी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट **संपादन**, उत्कृष्ट **मांडणी**, उत्कृष्ट **छपाई**, खास **मुलांसाठी** प्रसिद्ध होणारे दिवाळी अंक, **विनोदी** साहित्य, उत्कृष्ट **कादंबरी**, उत्कृष्ट **कथा**, उत्कृष्ट **लेख**, उत्कृष्ट **मुलाखत**, उत्कृष्ट **कविता**, **हास्यचित्रे**, **ई दिवाळी** अंक, **सामाजिक** दिवाळी अंक, **ध्वनीफिती**, **ध्वनीचित्रफिती**, **ब्रेललिपी**, **अनियतकालिक**, **शिक्षण** विषयक, **समाज** प्रबोधन आणि उत्कृष्ट **मुखपृष्ठ** अशा 20 प्रकारामध्ये 20 पुरस्कार स्मृती चिन्हाच्या स्वरुपात देण्यात येतील. साहित्य जगतात आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटनेचा पुरस्कार मानाचा समजाला जातो. केलेल्या कामाची पसंती आणि पोचपावती म्हणून मिळणा-या पारितोषिकांचे स्वरूप वेगवेगळे असते. काही पारितोषिके स्थानिक पातळीवर तर काही पारितोषिके जागतिक पातळीवर प्रतिष्ठेची समजली जातात. या पारितोषिकांनी सन्मानित होणा-या व्यक्तींची जागतिक पातळीवर दखल घेतली जाते. अशाच पारितोषिकामध्ये आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटनेच्या पुरस्काराचा समावेश होतो. वेगळी वाट धरून साहित्यविश्वात वेगळी ठसा उमटवणा-या तसेच वेगळा प्रवाह निर्माण करणा-या दिवाळी अंकांना या बहुप्रतिष्ठीत पुरस्काराने सन्मानित केले जाते. म्हणूनच साहित्य विश्वात या पुरस्काराचे वेगळेच स्थान आहे. महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील शेकडो नामवंत प्रकाशन संस्था आपले दिवाळी अंक या पुरस्काराच्या स्पर्धेत उतरवतात. लेखक, कवी, संपादक, प्रकाशक, वितरक, मुद्रक, मराठी साहित्याबद्दल प्रेम असणारे रसिक अशा सर्वांचा एक स्नेहसोहळा या निमित्त साजरा होतो.

विशेष आंतरराष्ट्रीय विनाशुल्क खुली मराठी दिवाळी अंक स्पर्धेमध्ये दिवाळी अंकातील साहित्य, वैविध्य, मांडणी आणि छपाईचा दर्जा या संदर्भात गुणवत्तेच्या निकषावर सर्वोत्कृष्ठ अंकांना वरील 20 प्रकारामध्ये मान्यवर मराठी व्यक्तीच्या हस्ते गौरवपर स्मृतीचिन्ह जयसिंगपुरात प्रदान केली जातील. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व दिवाळी अंकांना सहभाग प्रमाणपत्र दिली जाणार आहेत. स्पर्धेसाठी अधिकृतरित्या आलेल्या दिवाळी अंकामधूनच पुरस्कारांसाठी अंकांची निवड केली जाणार आहे. पत्रकारिता आणि साहित्य या क्षेत्रांतील मान्यवर या स्पर्धेसाठी परीक्षक असतील.

दिवाळी अंकांचा शतकोत्सव साजरा करण्यात सरकारने उदासीनता दाखविली. मी दिवाळी अंकांचा वाचक आहे. दिवाळी अंक आजही मला आनंद देतात. म्हणूनच मी या कार्यात सहभागी झालो. हे सांस्कृतिक वैभव जोपासणे, हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे. सगळ्यांनी मिळून ते पूर्ण करूया. दिवाळी अंकांनी काळानुरूप बदल केले आहेत. ही परंपरा यापुढेही कायम राहील असा मला विश्वास आहे. गेल्या **१०४ वर्षांतील दिवाळी अंकांचे कायमस्वरूपी संग्रहालय आणि वाचनालय** आम्ही सुरू करत आहोत. या स्पर्धेच्या निमित्ताने संग्रहित झालेल्या सहा अंका पैकी **दोन अंक या संग्रहालयासाठी** देण्यात येतील. व उर्वरित चार अंका पैकी **दोन अंक विविध ठिकाणावर भरवण्यात येणा-या दिवाळी अंक प्रदर्शनात मांडण्यात येतील** व **दोन अंक स्पर्धेसाठी** असतील. संपादकांनी आपले मागील दिवाळी अंक या संग्रहालयासाठी पाठवून या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करावे. **१९०९ साली पहिला दिवाळी अंक** काढणारे का. र. मित्र यांच्या सन्मानार्थ भारतीय टपाल विभागामार्फत टपाल तिकीट काढण्यासाठी आम्ही प्रस्ताव तयार केला असून तो लवकरच भारत सरकारला सादर केला जाईल व त्यांचे आजगावमध्ये स्मारक उभारण्यात यावे या साठी प्रयत्न केले जातील.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रवेश फी नसून या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणा-यानी आपल्या दिवाळी अंकाच्या सहा (६) प्रती नोंदणीकृत टपाल किवा कुरिअर मार्फत या संस्थे कडे सोमवार दिनांक **३१ डिसेंबर २०१२** पर्यंत किवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने प्राचार्य **डॉ. सुनिल पाटील**, कार्यकारी संचालक - **आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना**, जयसिंगपूर, सुदर्शन पॅलेस, प्लॉट # 16, पद्मावती हौसिंग सोसायटी, बायपास रोड, नांदणी नाक्याजवळ, माय स्कूलच्या पाठिमागे, **जयसिंगपूर** - 416101, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र, ईमेल - alishaadvertisingagencies@gmail.com या पत्यावर पाठवाव्यात किवा 02322 - 225500, 09975873569 या क्रमांकावर संपर्क साधावा. या स्पर्धेचा निकाल विजेत्या दिवाळी अंकाच्या नावासकट बातमीच्या माध्यमातून सर्व मान्यवर मराठी दैनिके, साप्ताहिके, आकाशवाणी केंद्रे, दूरदर्शन तसेच खासगी दुरचित्रवाहिन्याकडे प्रसिद्धीसाठी पाठवले जातील. तसेच या दरम्यान दिवाळी अंकांचे प्रदर्शनहि भरवण्यात येणार असून प्रदर्शनात मांडण्यासाठी दोन अंक पाठवावे. ज्यांनी स्पर्धेसाठी अंक पाठवलेले असतील त्यांनी प्रदर्शनासाठी वेगळे अंक पाठविण्याची आवश्यकता नाही. प्रदर्शनास कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही. **मागील वर्षी सर्व स्तरातून ५०० पेक्षा अधिक दिवाळी अंक सहभागी झाले होते**, प्रतिवर्षी दिवाळी अंकांची स्पर्धा वाढते आहे व स्पर्धकांचीही संख्या वाढते आहे. मागील स्पर्धेचा निकाल व संक्षिप्त अहवाल एखाद्या स्पर्धकाने लेखी मागणी केल्यास त्यास तो टपालाने पाठविला जाईल.

# दिवाळी अंक स्पर्धेसाठी पाठविण्यापूर्वी कृपया खालील बाबींचा विचार करावा

- आपला दिवाळी अंक मुदतीत पोहचायला हवा, शेवटच्या तारखेनंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.
- शक्यतो आपले पार्सल नोंदणीकृत डाकेने पाठवावे.
- कुरिअरने पाठविण्यापूर्वी जयसिंगपूर येथे कोणत्या कुरिअर कंपन्या सेवा देतात याची खातरजमा करावी किवा स्पर्धा आयोजकांशी संपर्क साधून कुरिअर कंपनी चे नाव जाणून घ्यावे.
- आपल्या दिवाळी अंकाच्या वेगळे पणाबद्दल १००० शब्दात परीक्षण पाठवावे. अथवा अन्य नियतकालिकात आपल्या दिवाळी अंक बाबत परीक्षण अथवा लेख छापून आला असल्यास त्या लेखाचे कात्रण किवा झेरॉक्स प्रत पाठवावी.
- आपल्या नियतकालिकाचा नमुना अंक (आपण जर नियतकालिक चालवत असाल तर)
- या पूर्वी प्राप्त झालेल्या अन्य पुरस्काराची माहिती

| क्र. | पुरस्कार देणारी संस्था | वर्ष | पुरस्कार प्रकार |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |

- नियमित अंकाचा प्रकाशन कालावधी

☐दैनिक ☐साप्ताहिक ☐पाक्षिक ☐मासिक ☐द्वैमासिक ☐त्रैमासिक ☐अर्धवार्षिक ☐वार्षिक ☐अनियतकालिक

- परीक्षक मंडळाचा निर्णय हा अंतिम राहील व या बाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.
- दिवाळी अंक व प्रकाशन संस्थेस असलेले अन्य सदस्यत्वाचा तपशील

| क्र. | संस्थेचे नाव | सदस्य होण्याचे वर्ष | सदस्यत्व प्रकार |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |

- एखादी किवा सर्व प्रवेशिका कोणत्याही करणा शिवाय नाकारण्याचा, कोणत्याही वेळी नियम - अटी मध्ये बदल करणे, पूर्व सूचना न देता स्पर्धा रद्द करण्याचा, स्पर्धेची मुदत कमी करण्याचा अथवा वाढविण्याचा, स्पर्धेचा निकाल राखून ठेवण्याचा आणि पारितोषिक वितरणाची तारीख ठरविण्याचा अधिकार आयोजकांना राहील.

**संपादकाची अधिकृत स्वाक्षरी** ____________ **शिक्का** **पूर्ण नाव** ________________________